# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः21.03.2026** **वारः शनिवार**

---

1. सर्व तेलशुद्धीकरण प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यरत असल्याचा सरकारचा पुनरुच्चार
2. पश्चिम आशियाई संघर्षाच्या अनिश्चिततेत वाढ
3. नवीन करप्रणालीच्या जागृतीसाठी 'प्रारंभ 2026' उपक्रमाची सुरुवात आणि
4. शाळाबाह्य मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण मंत्रालयाची विशेष मोहिम

**तेल शुद्धीकरण**

पश्चिम आशियातील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सर्व तेलशुद्धीकरण प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यरत असून एलपीजी अर्थात स्वयंपाकाचा गॅसचं उत्पादन स्थिर आणि पुरेसे असल्याचा पुनरुच्चार काल केंद्र सरकारनं केला. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी आंतर-मंत्रालयीन बैठकीला संबोधित करताना ही माहिती दिली. गेल्या एका आठवड्यात ग्राहकांना 11 हजार 300 टन व्यावसायिक एलपीजीचा पुरवठा करण्यात आला आहे. देशांतर्गत एलपीजी उत्पादनात 40 टक्क्यांनी वाढ झाली असून, किरकोळ विक्री केंद्रांवर एलपीजीचा साठा संपण्याच्या कोणत्याही घटना घडलेल्या नाहीत. एलपीजीचा काळाबाजार आणि साठेबाजी विरोधातील सुरु असलेल्या कारवाईत देशभरात साडेचार हजारहून अधिक ठिकाणी छापे टाकण्यात आल्याची माहितीही शर्मा यांनी देली.

गेल्या 24 तासांत समुद्रातील वाहतूकीशी संबंधित कोणतीही दुर्घटना किंवा घटना नोंदवली गेली नाही; तसेच सर्व 22 जहाजे आणि 611 भारतीय खलाशी सुरक्षित आहेत. असं बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी काल सांगितलं. नौवहन महासंचालनालय, या परिस्थिती सातत्याने लक्ष ठेवून असल्याचे त्यांनी नमूद केलं. 'न्यू मंगळूर बंदराने' कच्च्या तेलाच्या आणि एलपीजीच्या हाताळणीसाठी आकारल्या जाणाऱ्या शुल्कामध्ये सवलती जाहीर केल्या असल्याचंही त्यांनी स्पष्ट केले.

**अमेरिका**

पश्चिम आशियाई संघर्ष वेगाने अशांततेकडे जात आहे. आखाती देशांमधील प्रमुख ऊर्जा पायाभूत सुविधांवर झालेले लष्करी हल्ले आणि त्याला प्रत्युत्तर म्हणून करण्यात आलेले हल्ले यामुळे या क्षेत्रातील तणाव आणखीच वाढण्याची शक्यत असून, ईद-उल-फित्र आणि पर्शियन नववर्ष 'नौरोज'च्या उत्सवांवरही परिणाम दिसत आहे.

तेलाच्या वाढत्या किमतीला आळा घालण्याचे अमेरिकेकडून प्रयत्न सुरू असतानाच, ट्रम्प प्रशासन समुद्रात अडकलेल्या इराणच्या तेलावरील निर्बंध एका महिन्याच्या विशेष परवान्याअंतर्गत शिथिल करेल, अशी घोषणा अमेरिकन अधिकाऱ्यांनी केली आहे. ही तात्पुरती सवलत, कालपर्यंत जहाजांवर चढवण्यात आलेल्या इराणच्या तेलाला लागू असेल आणि ती पुढील महिन्याच्या 19 तारखेला संपुष्टात येईल. असं अधिकाऱ्यांनी सांगितलं.

दरम्यान, इराणसोबत युद्धविराम करण्याची शक्यता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाजमाध्यमावरील संदेशाद्वारे फेटाळली आहे. आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, अमेरिकेने या क्षेत्रात आणखी तीन युद्धनौका आणि एकंदर अडीच हजार अतिरिक्त लष्करी जवान तैनात केले आहेत. इराण-इस्त्रायल अमेरिका संघर्षाला तीन आठवडे उलटले असताना, जमिनीवरील लष्करी कारवाईची शक्यता दर्शवणारा हा एक संकेत मानला जात आहे.

**पंतप्रधान**

पश्चिम आशियातील संघर्षावर भारताची भूमिका स्पष्ट करण्याच्या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ओमान, मलेशिया, फ्रान्स, जॉर्डन आणि कतारच्या नेत्यांशी संवाद साधला. अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल दिली. परस्पर संवाद, तणाव कमी करणे आणि शांतता या मुद्यांवर चर्चेत भर देण्यात आला. पंतप्रधानांनी ऊर्जा पायाभूत सुविधांवरील हल्ल्यांचा तीव्र शब्दांत निषेध केला, तर सर्व बाजूंनी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षित जलवाहतुकीसाठी आणि समन्वय सुरू ठेवण्यासाठी पाठिंबा दर्शवला. असंही त्यांनी सांगितलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल बहारीनचे राजे हमद बिन ईसा अल खलिफा यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. अशी माहिती त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशांत दिली आहे. यावेळी त्यांनी पश्चिम आशियाई क्षेत्रातील सद्यस्थितीवर चर्चा केली. तसंच 'ईद-उल-फित्र'च्या निमित्ताने शुभेच्छाही दिल्या आणि बहारिनमधील भारतीय समुदायाच्या कल्याणासाठी बहरीनच्या राजांनी दिलेल्या सातत्यपूर्ण पाठिंब्याबद्दल त्यांचे आभार मानले.

**नवा कर कायदा**

येत्या एक एप्रिलपासून लागू होणाऱ्या नवीन प्राप्तीकर कायद्यामुळे त्रुटी, वाद आणि अनुपालन खर्च कमी राहतील असा विश्वास वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल नवी दिल्ली इथं या कायद्याबाबत जनजागृती करण्यासाठी आयोजित 'प्रारंभ 2026' या कार्यक्रमात बोलताना व्यक्त केला. नवीन कायदा कमी संदिग्ध आहे आणि ज्यांना तो समजून घ्यायचा आहे, त्यांच्यासाठी तो अधिक सुलभ आहे. यात 'अनुमानित कर आकारणी योजना' अधिक बळकट करण्यात आली आहे. या कायद्यातील प्रत्येक कलमाची नव्यानं शब्दरचना करण्यात आली आहे, तक्ते आणि सूत्रांद्वारे स्पष्टीकरणं देण्यात आली आहेत. त्यासाठी प्राप्तीकर अधिकाऱ्यांनी 75 हजार मानवी तास खर्च केले अशी माहिती सीतारामन यांनी दिली.

नवीन नियमामुसार, सरकारनं लागू केलेले आयकर नियम, पुढील महिन्याच्या १ तारखेपासून लागू होतील. आपल्या व्यवहारांच्या नोंदीचे खुलाशे करुन अनुपालन वाढवणं आणि नियमांची संख्या कमी करून कर प्रक्रिया सुलभ करणं हा या नवीन नियमांचा उद्देश आहे.

प्रत्यक्ष कर आकारणी अंतर्गत कार्यपद्धती आणि अनुपालन प्रणालींमध्ये एक मोठा फेरबदल करण्यात आला आहे. असं अर्थ मंत्रालयाने स्पष्ट केलं आहे. नवीन नियमांनुसार कंपन्यांना शेअर रजिस्टर ठेवणं, सर्वसाधारण सभा घेणं आणि लाभांश केवळ भारतातच देणं असे नियम लागू होणार आहेत. यामुळे लाभांश वितरणावर अधिक देशांतर्गत नियंत्रणावर मजबूती येणार आहे. शेअर बाजारातील अनुपालन अधिक मजबूत करण्यात आलं आहे. पारदर्शकता आणि डेटाची अखंडता सुधारण्यासाठी, शेअर बाजारांना आता सात वर्षांसाठी ऑडिट ट्रेल्स जतन करणे, व्यवहारांच्या नोंदी न लपवणं आणि सुधारित व्यवहारांवर मासिक अहवाल सादर करणं बंधनकारक असेल.

या नव्या नियमामुळे सीमापार कर संबंधी व्यवहारांसंदर्भात भारताच्या कर अधिकाऱ्यांना अतिरिक्त अधिकार मिळाले आहेत. या उपायांमुळे विवाद कमी होण्याची आणि अंमलबजावणी अधिक मजबूत होण्याची अपेक्षा आहे.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ईद-उल-फित्रच्या पूर्वसंध्येला काल देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण आत्मसंयम, दानधर्म आणि वंचितांविषयीच्या करुणेचा तसंच, प्रेम, बंधुभाव, शांतता आणि परस्पर सौहार्दाचा संदेश देतो. या शुभप्रसंगी आपण गरजूंची मदत करण्याचा, समाजात एकता आणि सौहार्द वाढवण्याचा आणि देशाच्या प्रगतीत योगदान देण्याचा संकल्प करूया. असं आपल्या शुभेच्छासंदेशांत म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही ईद-उल-फित्रच्या निमित्तान देशवासियांना शुभेच्छा ददिल्या आहेत.

**शाळाबाह्य**

सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने शाळाबाह्या आणि शाळा अर्धवट सोडलेल्या मुलांचा शोध घेऊन त्यांची नोंदणी करण्यासाठी केंद्र सरकार देशव्यापी मोहीम राबवणार आहे. अशी माहिती शिक्षण मंत्रालयानं काल दिली. राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत, 2030 पर्यंत 100 टक्के विद्यार्थी नोंदणीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हा उपक्रम राबवला जाणार आहे. आर्थिक, सामाजिक किंवा भौगोलिक अडचणींमुळे नियमित शाळेत जाणे शक्य नसलेल्या मुलांसाठी 'मुक्त शालेय शिक्षण' हा एक व्यवहार्य पर्याय शिक्षण मंत्रालयाद्वारे चालवला जातो. देशभरात दहा हजारांहून अधिक अभ्यास आणि परीक्षा केंद्रे असलेल्या 'राष्ट्रीय मुक्त विद्यालय संस्थे'द्वारे असे एक विस्तारक्षम व्यासपीठ उपलब्ध करून दिले जात आहे. यामुळे अशा सुविधेची गरज असलेल्या विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे शक्य होते.

**चाकणकर**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी काल आपल्या पदाचा राजीनामा दिला. कथित बलात्कार प्रकरणातील आरोपी अशोक खरात याच्याशी संबंध असल्याच्या आरोपावरून चाकणकर यांच्यावर टीकेची झोड उठली होती. वैयक्तिक कारणावरून आपण राजीनामा देत असल्याचं चाकणकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रात म्हटलं आहे. चाकणकर या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या महिला आघाडीच्या प्रमुख असून त्यांनी या पदावरूनही पायउतार होत असल्याचं पत्र पक्षप्रमुख सुनेत्रा पवार यांना दिलं आहे. अशोक खरात प्रकरणाची गंभीर दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली असून दोषींवर कडक कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत.

**निवडणूक-आयोग**

आसाम, केरळ, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या चार राज्यांमध्ये, तसेच पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशात होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुका आणि सहा राज्यांमधील पोटनिवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, निवडणूक आयोगाने इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल माध्यमांवरील राजकीय जाहिरातींचे नियमन करण्याबाबत आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार, सर्व राजकीय पक्ष, उमेदवार आणि अगदी व्यक्ती किंवा संस्थांनाही, आपल्या जाहिराती प्रकाशित करण्यापूर्वी 'माध्यम प्रमाणीकरण आणि देखरेख समिती'कडून पूर्वमंजुरी घेणं अनिवार्य आहे. हा नियम दूरचित्रवाणी, रेडिओ, सार्वजनिक ठिकाणी लावण्यात येणारे फलक, ई-पेपर्स, बल्क एसएमएस, ध्वनी संदेश आणि समाजमाध्यमावरील संदेशांद्वारे प्रदर्शित होणाऱ्या जाहिरातींना लागू असल्याचं आयोगानं म्हटलं आहे.

**बॅडमिंटन**

फ्रान्समध्ये सुरू असलेल्या ऑर्लेन्स मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या तन्वी शर्मा हिचा महिला एकेरीचा उपांत्य फेरीचा सामना आज जपानच्या गतविजेत्या नोझोमी ओकूहारा हिच्याबरोबर होणार आहे. उपांत्य फेरीच्या दुसऱ्या सामन्यात भारताची इशारानी बारूआ हिची गाठ थायलंडच्या खेळाडूबरोबर पडणार आहे. पुरुष दुहेरीत मात्र भारताचं आव्हान उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आलं.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार